# जमिनींचे तुकडे प्रतिबंध अधिनियमात सुधारणांसाठी समिती

## स्थापन, जीआर जारी, १५ दिवसांत अहवाल येणार

**मुंबई** – राज्य सरकारने महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७फ मध्ये सुधारणा करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून, अधिनियमातील तरतुदींविरुद्ध झालेल्या जमिनींच्या तुकड्यांचे नियमितीकरण करण्याची प्रक्रिया सुलभ करण्यावर ही समिती लक्ष केंद्रित करणार आहे. महसूल व वन विभागाने यासंदर्भात शासन निर्णय जारी केला आहे.

शेत जमिनींचे लहान तुकडे होण्यापासून रोखण्यासाठी आणि किफायतशीर शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी १९४७ चा अधिनियम लागू करण्यात आला होता. मात्र, अनेक वर्षांपासून या अधिनियमामुळे उद्भवणाऱ्या अडचणी आणि जमिनींच्या अनधिकृत तुकड्यांच्या नियमितीकरणाची मागणी जोर धरत होती. सध्या सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत यासंबंधीची लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. त्यावेळी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून १५ दिवसांत याबाबत (एसओपी) मानक कार्यप्रणाली तयार करण्याचे आश्वासन दिले होते.

**समितीची रचना आणि कार्यकक्षा**

अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत अपर मुख्य सचिव (नगरविकास-१), प्रधान सचिव (ग्रामविकास), जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, संचालक (नगर रचना), सह/उप सचिव (विधि व न्याय विभाग) यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधिकरण येथील सदस्य (प्रशासकीय) राजेंद्र क्षीरसागर आणि सेवानिवृत्त संचालक (नगर रचना) एन. आर. शेंडे हे निमंत्रित सदस्य म्हणून मार्गदर्शन करतील.

नागरी क्षेत्र वगळल्यामुळे होणाऱ्या जमिनीच्या हस्तांतरणामुळे त्या भागातील विकासाचे नियोजनबद्ध हस्तांतरण व विकासाची कार्यपद्धती ठरवणे.

अधिनियमाच्या कलम ८ ब मधील तरतुदींच्या अनुषंगाने नियमितीकरणाची प्रक्रिया कशी सुलभ करता येईल आणि नियमितीकरणाची व्यवहार्यता तपासणे.

कलम ९ (३) नुसार तुकड्यांच्या नियमितीकरणाची कार्यपद्धती निश्चित करणे.

नोंदणीकृत दस्ताने झालेल्या तुकड्यांचे नियमितीकरण आणि त्यांच्या हस्तांतरणाची अधिकार अभिलेखात नोंद घेण्यासाठी मानक कार्यप्रणाली ठरवणे.

अनोंदणीकृत खरेदी व्यवहारांमध्ये खरेदीदारांचे नाव अधिकार अभिलेखात घेण्यासाठी कायद्यात सुधारणा आवश्यक असल्यास त्या सुचवणे.

नोंदणीकृत खरेदी व्यवहारांचे नियमितीकरण मोहिम स्वरूपात घेणे.

अनोंदणीकृत खरेदी व्यवहारामुळे झालेल्या तुकड्यांचे नियमितीकरण आणि त्यानंतरच्या नोंदणी प्रक्रियेची कार्यपद्धती ठरवणे.

समितीला १५ दिवसांत शासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील जमिनींचे तुकडे पाडण्यासंबंधीच्या अनेक वर्षांच्या जटिल प्रश्नावर तोडगा निघणार आहे. जमिनीच्या नोंदी अधिक स्पष्ट होतील आणि नागरिकांना होणारा त्रास कमी होईल. अधिवेशन संपण्यापूर्वी अध्यादेश निघेल असे सांगितले होते, असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

# अवैध सावकारी प्रकरणांची जिल्हाधिकारी स्तरावर चौकशी

**मुंबई (प्रतिनिधी)**–शासकीय परवाना नसताना सावकारी व्यवसाय करून शेतकऱ्यांच्या जमिनी बेकायदेशीरपणे हडप करण्याच्या तक्रारींवर आता जिल्हाधिकारी स्तरावर चौकशी करण्यात येणार येत असल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी बुधवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. तसेच जमीन हडपण्याच्या आतापर्यंतच्या अशा प्रकरणांमध्ये ७७१ हेक्टर जमीन शेतकऱ्यांना परत मिळवून देण्यात आल्याचेही पाटील यांनी सांगितले.

राज्यातील अवैध सावकारीबाबत शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या संजय देरकर यांनी प्रश्न विचारला होता. यावेळी विचारण्यात आलेल्या प्रश्नांना उत्तर देताना पाटील म्हणाले, राज्यात अवैध सावकारीच्या माध्यमातून अनेक शेतकऱ्यांची जमीन हडप केल्याच्या तक्रारी प्राप्त होत असून, अशा प्रकरणांमध्ये शासनाने कठोर भूमिका घेतली आहे. परवाना नसलेल्यांनी सावकारी करणे बेकायदेशीर आहे. फक्त परवानाधारकांनीच कायदेशीर व्याजदर आकारून व्यवहार करावा. तसेच सावकारांनी व्याजदराची माहिती त्यांच्या कार्यालयाच्या बाहेर लावणे आवश्यक आहे तसेच वार्षिक व्याज आकारणीचेही पालन केले पाहिजे. तक्रारदारांनी विशिष्ट सावकारांची आणि कर्जदारांची माहिती दिल्यास संबंधितांना न्याय मिळवून देण्यात येईल.

सन २०२१ ते २०२४ या कालावधीत राज्यात अवैध सावकारी संदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यावर योग्य ती चौकशी करण्यात आली आहे. यावेळी आमदार नाना पटोले, समीर कुणावार, प्रशांत बंब, अभिजित पाटील यांनी उपप्रश्न विचारले.

# मरणाच्या दारात माणुसकी अनुभवली : इंद्रनाथ थोरात



**उक्कलगाव (वार्ताहर)**– माझ्यावर दिवसाढवळ्या हल्ला केला, तेव्हा मी, आतापर्यंत जी काही समाजसेवा केली, लोकांशी चांगला वागलो, तीच माणुसकी मरणाच्या दारात अनुभवली आणि सुरक्षित राहिलो, असे मत श्रीरामपूर पंचायत समितीचे माजी सभापती व ज्येष्ठ नेते इंद्रनाथ थोरात यांनी व्यक्त केले.

श्रीरामपूर तालुक्यातील वाचन संस्कृती प्रतिष्ठान आणि साहित्य परिवाराने इंद्रनाथ थोरात यांची भेट घेतली, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी प्राचार्य टी.ई. शेळके, माजी प्राचार्य डॉ. शंकर गागरे, वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. बाबुराव उपाध्ये, विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानचे संस्थापक, अ‍ॅड.विलास थोरात, मातापूर विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय थोरात सचिव सुखदेव सुकळे, प्रा.शिवाजी बारगळ, अरुण घुमरे, ऋषिकेश घुमरे आदी उपस्थित होते.

इंद्रनाथ थोरात म्हणाले की, चोरीच्या उद्देशाने नरसाळी गावाच्या परिसरात प्रवासात झालेल्या हल्ल्यात गुन्हेगारांनी तीव्र हत्याराने अचानक हल्ला केला. माझ्या डोळ्याला गंभीर जखम झाली. परंतु आजूबाजूच्या मित्रपरिवाराने धाव घेत मला वाचविले. मला माझ्या चांगल्या कर्माची जाणीव त्यावेळी झाली. मित्रांनी मरणाला न घाबरता मला सुरक्षित ठेवले. पाठीमागून सतिश बोर्डे मित्रपरिवार, लोक मदतीला धावून आले. मरणाच्या दारातून मी परत आलो. जालना येथे १५ दिवस उपचार घेतले. परंतु मला माझे चांगले काम आणि लोकांशी चांगले संबंध हेच माझ्या मदतीला देवासारखे धावून आले. हीच खरी माणुसकी जपली असे श्री. थोरात यावेळी म्हणाले.

# संगमनेर येथे ‘मिशन आरंभ’ कार्यशाळा

**संगमनेर (प्रतिनिधी)** – संगमनेर तालुक्याची 'मिशन आरंभ' कार्यशाळा जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल येथे दिं.१५ जुलै २०२५ रोजी संपन्न झाली. शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ (इयत्ता पाचवी -आठवी) वर्गशिक्षकांसाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) भास्कर पाटील म्हणाले, नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेतील यश हे मिशन आरंभ या उपक्रमाची फलनिष्पत्ती आहे. या उपक्रमामुळे जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पाचवीचा पट वाढला आहे. सर्व शिक्षकांनी यशाचे हेच सातत्य कायम ठेवून अजूनही उत्तुंग यशाची भरारी घ्यायची आहे. त्यासाठी नियोजन, विश्लेषण, मेहनत व त्याग यांचा अवलंब करायचा आहे. असे त्यांनी सांगीतले.

जिल्हा नोडल अधिकारी जयश्री कारले यांनी वर्षभराच्या नियोजनाची अंमलबजावणी कशी करायची याबद्दल माहिती दिली. तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड यांनी संगमनेर तालुक्याने यावर्षी नवोदय व शिष्यवृत्तीत मिळवलेल्या यशाबद्दल शिक्षकांचे अभिनंदन केले. या पुढील वर्षीही असेच उत्तम यश मिळवायचे आहे. यासाठी शिक्षकांना प्रेरित केले.

कार्यशाळेमध्ये नवोदय व जिल्हा शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी ईश्वरी खिलारी, प्रसाद तोरकडी, ईश्वरी देशमुख, यशश्री देशमुख, तपस्या कोरडे, तेजस जाधव, पूर्वा कडलग, आराध्या वाकचौरे, अनुश्री साबळे, ओम बडे, निलेश पवार, रिदीमा देशमुख, कार्तिक आठरे, ईश्वर सोनवणे हे विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे हरिभाऊ करकंडे, छाया गायकवाड, संगीता पाटोळे, अशोक मधे, राजू आव्हाड




व पाराजी सोनवणे यांचा सन्मान करण्यात आला. मागील वर्षी ऑनलाइन तासिकेचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल संदीप पावसे व एम. एड पदवी प्रथम श्रेणीत प्राप्त केल्याबद्दल बाळासाहेब जाधव यांचा सन्मान करण्यात आला. कार्यशाळा आयोजनाचे नियोजन तालुका शिष्यवृत्ती नोडल अधिकारी कल्याण राऊत यांनी केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन बाळासाहेब जाधव केंद्रप्रमुख देवगाव व आभार प्रदर्शन बाळासाहेब जाधव यांनी केले.

कार्यशाळेसाठी जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल चे संस्थापक अध्यक्ष डॉ. माणिकराव शेवाळे, प्राचार्य डांगे, शिक्षण विस्तार अधिकारी मंगला कलगुंडे, दत्तात्रय मैड, नंदा वलवे, श्रीमती ठोकळ तर केंद्रप्रमुख सुनील नरसाळे, सुभाष राहणे, रविंद्र अनाप, विनायक भोसले, पार्वती गाडेकर, आशा घुले, कल्पना बिडवे उपस्थित होते.

# शहीद जवान मेजर संदीप घोडेकर यांचे संगमनेरात स्मारक व्हावे :काँग्रेसची मागणी

**संगमनेर (प्रतिनिधी)** – संगमनेर तालुक्यातील मेजर संदीप घोडेकर यांचे देशसेवा बजावत असताना हृदयविकाराने निधन झाले. मेजर संदीप घोडेकर यांनी देशासाठी दिलेले बलिदान याचा विचार करून त्यांचे संगमनेर तालुक्यात स्मारक व्हावे, अशी मागणी संगमनेर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे.

संगमनेर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांना याबाबतचे निवेदन देण्यात आली यावेळी शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, विश्वासराव मुर्तडक ,राजेंद्र वाकचौरे, गणेश मादास, नितीन अभंग, जावेद खान पठाण, मुजिक खान, वसीम शेख ,आवेद खान, डॉ. विजय पवार , शेहेबाजअली शेख, अल-ोक बर्डे ,बादल जेधे, ललित शिंदे ,शरद पावबाके, एकनाथ श्रीपत, सुभाष दिघे, संजय कानवडे यांसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील मेजर संदीप घोडेकर हे दिल्ली येथे भारतीय सैन्य दलात कर्तव्य बजावत असताना त्यांना वीरमरण आले. त्यांची देशाप्रती असलेली निष्ठा व कर्तव्यपरायनता भविष्यात संगमनेर शहरातील नागरिकांना कायम देशसेवेसाठी प्रेरणा व स्फूर्तीदायी असणार आहे. त्यासाठी त्यांचे संगमनेर येथे स्मारक होणे गरजेचे आहे. तसेच संगमनेर येथील अकोला नाका चौकाला शहीद मेजर संदीप घोडेकर यांचे नाव देण्यात यावे. अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.



### घोडेकर यांनी दिलेले बलिदान कायम स्मरणात राहील

संगमनेरचे सुपुत्र मेजर संदीप घोडेकर हे देशसेवा बजावत असताना त्यांना मृत्यू आला. सैनिक हा घरदार सोडून देशाच्या सेवेकरता रात्रंदिवस सज्ज असतो. देश सेवा करताना वीरमरण आलेले हुतात्मा मेजर संदीप घोडेकर यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखदायक आणि मनाला वेदना देणारी आहे. त्यांनी दिलेले देशाकरता बलिदान हे संगमनेर करांच्या कायम स्मरणात राहील.

**– बाळासाहेब थोरात, माजी मंत्री**

संगमनेर शहरातील घोडेकर परिवारातील मेजर संदीप घोडेकर यांनी कायम देशसेवेला प्राधान्य दिले. देशी सेवेसाठी जीवन समर्पित करणाऱ्या या वीर जवानाने अखेरचा श्वासही सेवेत घेतला. इतक्या लवकर जाणे दुर्दैवी आहे. त्यांच्या परिवाराच्या दुःखात संगमनेर तालुका परिवार सहभागी असून त्यांचे हुतात्मे हे देशासाठी असून सदैव संगमनेर करांना संस्मरणीय राहील अशी भावना माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी व्यक्त केली आहे.

# संभाजी ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड यांच्यावरील हल्ल्याचा निषेध

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– पुरोगामी विचारांचे प्रचारक, समाजप्रबोधनकर्ता आणि बहुजन तरुणांच्या आयुष्याला दिशा देणारे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट (जि. सोलापूर) येथे झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करत भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मा.ले.) लिबरेशन यांच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. सदरचे निवेदन श्रीरामपूर महसूलचे नायब तहसीलदार बी.बी. गोसावी यांनी स्विकारले.

या निवेदनात म्हंटले आहे की, प्रवीण गायकवाड यांच्यावर शाईफेक करून, त्यांना गाडीतून खाली खेचून मारहाण करण्यात आली. हा हल्ला पूर्वनियोजित कट होता, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. ही गंभीर स्वरूपाची बाब आहे. या घटनेची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

यावेळी श्रमिक महासंघाचे अध्यक्ष कॉ. बाळासाहेब सुरुडे, श्रमिक शेतकरी संघटनेचे राज्याध्यक्ष कॉ. राजेंद्र बावके, कॉ.जीवन सुरुडे, कॉ.शरद संसारे,




कॉ.मदिना शेख, कॉ. श्रीकृष्ण बडाख, उत्तम माळी, प्रकाश भांड, हसन शेख, प्रकाश पवार, अश्रू बर्डे, नानासाहेब तारडे आदी उपस्थित होते.

# ताराबाई माळवे यांचे निधन



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)** – येथील सुवर्णकार समाजाच्या ताराबाई अशोक माळवे (वय ६०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्या प्रशांत अशोक माळवे यांच्या आई होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा आणि दोन मुली, सुना, पुतणे, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे.

## पान १ वरुन

### बेकायदेशीर शुल्कवाढ नियमात...

अधिनियमानुसार प्रत्येक शाळेत पालक-शिक्षक संघ स्थापन करणे बंधनकारक असून त्या संघातील कार्यकारी समितीच शुल्क वाढीबाबत निर्णय घेते. मात्र, सध्याच्या तरतुदींमध्ये काही सुधारणा आवश्यक असल्याने शिक्षण विभागाने त्याचा अभ्यास सुरू केला आहे. शिक्षण हा व्यवसाय नसून सामाजिक बांधिलकीचे कार्य आहे. कोणीही गरजेपेक्षा जास्त शुल्क आकारू नये, ही सरकारची भूमिका असल्याचे भुसे यांनी सांगितले.

### शालेय साहित्य खरेदीसाठी...

आणि तक्रार मिळाल्यावर संबंधित संस्थेविरुद्ध चौकशी करून कारवाई केली जाईल,असा इशारा भुसे यांनी दिला.

### जिल्ह्यात जुलै ते ऑक्टोबर...

तथापि विभागिय आयुक्त, नाशिक कार्यालयाने त्यांच्या दि. २६ मार्च २०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर शेतीपिकांचे व फळपिकांच्या नुकसानीचा अहवाल जुन्या दराने सादर केलेला होता. १ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचा वाढीव दराप्रमाणे रु.२०५.५१ लक्ष इतक्या अतिरिक्त निधी मागणीचा प्रस्ताव विभागिय आयुक्त, नाशिक यांनी संदर्भक्र.१० येथील पत्रान्वये सादर केला आहे. उपरोक्त केलेल्या मागणीनुसार हा निधी मंजूर करण्यात आला आहे.

### महिलेच्या तक्रारीवरुन मुल्लाच्या...

ते मला म्हणाले की, तु मुल्ला कटरच्या विरुध्द साक्ष देवू नकोस, त्याने काहीच केले नाही, असे तू कोर्टात सांग. तो माझा कार्यकर्ता आहे. तु आमच्याप्रमाणे साक्ष दिली तर तुला दोन लाख रुपये देण्यात येईल. माझे ऐकले नाही, तर तुला कुठे संपवून टाकील ते कळणार नाही. तू पुढच्यावेळी श्रीरामपूरला आली की, मुल्ला कटरचा भाऊ तुला ५० हजार रुपये देईल. बाकी काम झाल्यावर भेटतील, असे म्हणुन ते निघून गेले. त्यानंतर घाबरुन मी पुण्याला निघून गेले.

दि. १९ जुलै रोजी माझी साक्ष असल्याने दि. १५ जुलै रोजीच मी श्रीरामपूर येथे आले होते. सकाळीच मुल्ला कटरचा भाऊ रिजवान कुरेशी याने मला त्याच्या गाडीवर बसून श्रीरामपूर कोर्टात आणले. तिथे एका वकीलाने माझे एका कोऱ्या कागदावर सही व अंगठे घेतले. त्यानंतर मी कोर्टापासून रिक्षात बसून श्रीरामपूर बस स्टॅन्ड येथे येत असताना रिजवान कुरेशी याने रिक्षा थांबवून तू माझ्या भावाविरुध्द साक्ष दिली, तर तुला मारुन टाकू, तु जर आमच्या बाजूने साक्ष दिली, तर आम्ही तुला २ लाख रुपये देऊ, लगेच आता तुला ५० हजार रुपये देतो, असे म्हणत जातीवाचक शिवीगाळ केली. त्यावरून एका महिलेला जातीवाचक शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात भाजपाचे प्रकाश चित्ते, मुल्ला कटरचा भाऊ रिजवान कुरेशी यांच्याविरुध्द भारतीय न्याय संहीता २३२, १२६(२), ३५१(२), ४९ तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ चे कलम ३(१)(r)(s) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख हे करत आहेत.

### शिर्डीतील ‘ग्रो मोअर’चा प्रमुख...

एम.पी.आय.डी. विशेष न्यायालयासमोर हजर केले असता त्याला न्यायालयाने ९ दिवसांची (२५ जुलैपर्यंत) पोलीस कोठडी सुनावली आहे.

राज्यभरातील हजारो गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. नाशिक, शाहादा (जि. नंदूरबार), शिर्डी आणि राहाता पोलीस ठाण्यांमध्ये त्याच्यासह साथीदारांवर गुन्हे दाखल आहेत. शिर्डी व राहाता येथील दाखल गुन्ह्यांचा तपास पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशाने येथील आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला आहे. पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक युवराज आठरे या गुन्ह्याचा तपास करीत आहेत. पैसे दुप्पट करण्याचे स्वप्न दाखवून या कंपनीने अनेक सामान्य गुंतवणूकदारांना आपल्या जाळ्यात ओढले आहे. शितल गोरखनाथ पवार (वय ३३, रा. पैजनबाबाचा मळा, राहाता) यांनी ४ जुलै रोजी राहाता पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून भूपेंद्र सावळे याच्यासह भाऊसाहेब आनंदराव थोरात, संदीप सावळे, सुबोध सावळे व राजाराम भटू सावळे (सर्व रा. शिर्डी) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शाहादा पोलिसांनी भूपेंद्र सावळे याला अटक केली होती. त्याच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्याने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत नंदूरबार कारागृहात करण्यात आली होती. दरम्यान, नगरच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी भूपेंद्र सावळेला न्यायालयाच्या आदेशाने मंगळवारी (१५ जुलै) सायंकाळी ताब्यात घेतले. त्याला राहाता येथील गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. त्याला तपासी अधिकारी सहायक निरीक्षक आठरे यांनी बुधवारी राहाता न्यायालयासमोर हजर केले होते.

भूपेंद्र सावळे याच्या आमिषाला बळी पडून शिर्डी व राहाता परिसरातील अनेक गुंतवणुकदारांची करोडो रूपयांची गुंतवणुक ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट फायनान्स या कंपनीत केली असून भूपेंद्र सावळे याच्याकडून सदरची रक्कम हस्तगत करायची आहे, गुंतवणुकीची रक्कम सावळे याने स्वत:चे फायद्यासाठी वापरली असल्याचा संशय असल्याने त्याचा तपास करायचा आहे, भूपेंद्र सावळे याने ग्रो मोअर कंपनीच्या बँक खात्यातून वेळोवेळी काही संस्थानला मोठ्या प्रमाणात रक्कम वर्ग केलेल्या आहेत व त्या रोखीने काढल्या आहेत याबाबत त्याच्याकडे तपास करायचा आहे यासाठी त्याला १० दिवस पोलीस कोठडी मिळण्याची विनंती निरीक्षक आठरे यांनी केली. न्यायालयाने २५ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

### फडणवीसांची सभागृहात थेट...

यांनी काढला. हिंदुत्वाची कडवट भूमिका घेणारा कार्यकर्ता म्हणजे दानवे. भोंग्याविरोधात त्यांनी अनेक निवेदनं दिली. ते जरी बंटी पाटील यांच्या बाजूला बसले असले तरी ते कट्टर सावरकरवादी आहेत, असं म्हणत त्यांनी काँग्रेसलाही डिवचलं.

फडणवीस पुढे म्हणाले की, अंबादास दानवे मूळचे भाजपमधले.. काही कारणांमुळे पक्षाने त्यांना सोडलं, पण त्यानंतर ते त्यावेळचा आमचा मित्र पक्ष असलेल्या शिवसेनेत गेले. काही बदल झाले असले तरी शिवसेना आजही आमचा मित्र पक्ष आहे. तसंच राहुल गांधी जोपर्यंत युवा नेते आहेत तोपर्यंत तुम्ही आणि मी दोघंही युवा नेते आहोत असाही टोलाही त्यांनी लगावला.

अंबादास दानवे यांचं राजकीय जीवन भाजपमध्ये घडलं. शिवसेनेत त्यांनी विविध पदांवर काम केलं. जनसंवाद आणि वृत्तपत्र विद्येत त्यांनी एम ए केलं. ते बातम्या संकलित करतील अपेक्षा होती पण ते बातम्या पुरवणारे झाले. राजकीय क्षेत्रात पत्रकार आणि वकील सगळ्यात जास्त पहायला मिळतात. सभागृहाला एक चांगला नेता मिळाला. भाजपाच्या मुशीत तयार झाल्याने त्यांच्यात अभ्यासू वृत्ती, चिकाटी पाहण्यास मिळते. इतर पक्षांमध्ये असं होत नाही असं नाही. पण १५ वर्षे ते भाजपात होते, हे सांगायला फडणवीस विसरले नाहीत.

### जिल्ह्यातील अवैध गुटखा...

जिल्ह्याच्या दरोडा प्रतिबंधक पथकाचे प्रमुख म्हणून त्यांनी उत्कृष्टपणे काम पाहिल्याने सहाजिकच जिल्ह्यातील अनेक जणांशी त्यांची ओळख आहे. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या पोलीस अधिक्षकपदाचा पदभार स्विकारताच अनेकांनी त्यांचा सत्कार करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात गर्दी केली.

सत्कारासाठी जमलेल्या गर्दीत एक धोतर घातलेले वयोवृध्द श्री. घार्गे यांना दिसले. मात्र गर्दीमुळे त्या वयोवृध्दास आत येता आले नाही. हे श्री.घार्गे यांच्या नजरेतून सुटले नाही. त्यांनी गर्दी कमी झाल्यावर त्या आजोबांना आपल्या केबीनमध्ये बोलावून घेतले. शेवगाव तालुक्यातील एका छोट्या खेडेगावातून आलेले आजोबा त्यांच्या शेतातील रस्त्याबाबत तक्रार घेऊन आले होते. ती ऐकून घेतल्यावर श्री. घार्गे यांनी गावात काय वातावरण असा प्रश्न आजोबांना केला. त्यावर ते आजोबा म्हणाले, साहेब पूर्वी गावात एकही पानटपरी नव्हती, आता पाच पानटपऱ्या झाल्या आहेत. तेथे गुटखा विक्री होत असल्याने तरुण पिढीसह लहान मुलेही गुटखा व्यसनाच्या आहारी गेली आहेत. माझा सहा वर्षाचा नातूही गुटखा खातो. त्याला या व्यसनापासून दूर करण्याचा बराच प्रयत्न केला मात्र तो ऐकत नाही. त्यामुळे त्याचा गुटखा खाणे बंद कसे करावे हे समजत नाही. आजोबांची ही हतबलता पाहून श्री. घार्गे काही काळ स्तब्ध झाले.

ते आजोबा गेल्यावर श्री. घार्गे यांनी तत्काळ जिल्ह्यात प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधिक्षक म्हणून आलेले व अवैध व्यावसायिकांचा ‘कर्दनकाळ’ ठरलेले संतोष खाडे यांना बोलवून घेतले. संपूर्ण जिल्ह्यातील गुटखा तसेच मावा बनविणारे केंद्र तसेच अवैध गुटखा विक्री वर कारवाई करण्याचे आदेश दिले.

श्री. खाडे यांनीही वरिष्ठांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवत गुटख्याविरोधी धडाकेबाज कारवाई सुरु केली आहे. आतापर्यंत त्यांनी अवैध गुटखा व्यावसायावर धाडी टाकून कारवाई केली आहे. त्यात सुमारे सव्वा कोटीचा मुद्देमाला जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध गुटखा व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहे.